सकाळ
सातारा, शनिवार,
२७ सप्टेंबर २०१४

# पश्चिम घाटासंबंधीच्या अहवालाबाबत गैरसमज

## डॉ. मधुकर बाचूळकर : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू

सातारा, ता. २६ : पश्चिम घाटाबाबत डॉ. माधव गाडगीळ यांच्या समितीच्या अहवालाबाबत सत्ताधारी व शासकीय अधिकाऱ्यांनी नागरिकांत गैरसमज पसरविण्याचे काम केले, असा आरोप ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केला. आजपासून सैनिक स्कूलच्या सभागृहात किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू झाला. त्याचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी आश्विन मुद्‌गल यांच्या हस्ते झाले. 'पश्चिम घाटातील जैवविविधता' विषयावर ते बोलत होते. महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, अनुभव फिल्म क्लबचे अध्यक्ष शिरीष चिटणीस, डॉ. संदीप श्रोत्री उपस्थित होते.



सातारा : आश्विन मुद्‌गल यांच्या हस्ते शुक्रवारी 'वसुंधरा सन्मान पुरस्कार' स्वीकारताना डॉ. संदीप श्रोत्री. त्या वेळी शिरीष चिटणीस, डॉ. मधुकर बाचूळकर, राजभूषण सहस्त्रबुद्धे आदी. (नरेंद्र जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

डॉ. बाचूळकर म्हणाले, "डॉ. गाडगीळ यानी पश्चिम घाटाचा भाग पाई हिंडून माहिती घेतली. अभ्यासपूर्ण पद्धतीने त्यांनी अहवाल तयार केला व सादर केला. जैवविविधतेच्या वैशिष्ट्यांसह भूभाग संवर्धन करणे कसे गरजेचे आहे. कोणती पद्धत अनुसारावी, हे स्पष्ट सांगितले. मात्र, शासनकर्त्यांनी अहवालामुळे विकास खुंटेल अशी भीती व्यक्त केली. अधिकाऱ्यांनीही चुकीच्या गोष्टी पसरविल्या. १९८५ मध्ये जाहीर कोयना अभयारण्याची अंतिम अधिसूची अजून जाहीर झालेली नाही, इतके शासन बेफिकीर आहे."

पर्यावरण रक्षणासाठी सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकारी मुद्‌गल यांनी उद्‌घाटनपर भाषणात सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते डॉ. श्रोत्री यांना 'वसुंधरा सन्मान' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पाच हजार रुपये, सन्मानपत्र असे स्वरूप आहे. डॉ. श्रोत्री यांनी मनोगत मांडले. शिरीष चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. लायन्स क्लब ऑफ सातारा-गेंडामाळचे सुनील मोरे, अनुभव फिल्म क्लबचे उपाध्यक्ष ॲड. गिरीश कुलकर्णी, सचिव राजभूषण सहस्त्रबुद्धे उपस्थित होते.